महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद-४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल : roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/2468 दिनांक : 31 DEC 2020

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित पदविका/पदवी /पद्व्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय : **"माझी वसुंधरा #Epledge" अंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून हरित शपथ घेण्याबाबत. . .**

संदर्भ : मा.प्राधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रं. मावअ २०२०/प्र.क्र.८/संचालनालय, दिनांक २९ डिसेंबर २०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.प्राधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भीय पत्र सोबत जोडले असुन, पत्रामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचने प्रमाणे आपल्या संस्थेत दि. १ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी २०२१ या कालावधीत "**हरितशपथ**" (Earth Pledge म्हणजेच #Epledge) बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

दि. १ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत "**हरितशपथ**" (Earth Pledge म्हणजेच #Epledge) बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल फोटोसह या कार्यालयास सादर करावा.

सोबत : उपरोक्त प्रमाणे.

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

पर्यावरण व वातावरणीय
बदल विभाग,
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई -४०००३२

मनीषा पाटणकर म्हैसकर, भा.प्र.से.
प्रधान सचिव

# माझी वसुंधरा अभियान

क्रमांक:मावअ २०२०/ प्र.क्र.८/ संचालनालय
दिनांक: २९ डिसेंबर, २०२०

**विषय : "माझी वसुंधरा #Epledge"अंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून हरित शपथ घेण्याबाबत.**

**महोदय,**

पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांसोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैवविविधतेचेही अस्तित्व राहणारनाही. यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग,राज्यातील इतर विभाग, इतर राज्ये, केंद्र, अशासकीय संस्था, पर्यावरणवादी आणि राज्यातील प्रत्येक नागरीक यांच्यासह एकत्रितपणे कार्यकरीतआहे.याचाच एक भाग म्हणून निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **"माझी वसुंधरा अभियान"** हे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये व पंचायतराज संस्थांमध्ये राबविण्यास सुरवात झाली आहे. याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत सुलभ संदर्भासाठी ***जोडपत्र-१*** म्हणून सोबत जोडली आहे.

वसुंधरेप्रती आपली जबाबदारी म्हणून राज्यातील प्रत्येक नागरीकांनी पर्यावरण रक्षणासाठी आपला सहभाग नोंदवावा यासाठी दिनांक १ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत "हरितशपथ"(**Earth Pledge म्हणजेच #Epledge**) घेण्याची मोहिम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरीकांनी "हरितशपथ" (**Earth Pledge** म्हणजेच **#Epledge)** घेवून त्याची अंमलबजावणी

करणे अपेक्षित आहे. त्यानुसार, कार्यवाही करण्याच्या सूचना विभाग, जिल्हा, शहर व ग्रामस्तरावरील यंत्रणांना या विभागामार्फत देण्यात आल्या आहेत.

३. मंत्रालय हे राज्य शासनाचे सर्वोच्च कार्यालय असल्याने मंत्रालयामधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनीही पर्यावरणाच्या रक्षणासाठी "हरित शपथ" **(Earth Pledge** म्हणजेच **#Epledge)** घेवून त्याची अंमलबजावणी केल्यास, त्यामुळे राज्यातील इतर नागरीकांनाही प्रोत्साहन मिळेल व पर्यावरणाच्या रक्षणाप्रती मदत होवू शकेल.

४. सदर हरित शपथ https://majhivasundhara.in या वेब पोर्टलवर **#Epledge** येथे क्लिक करून ग्रुपने अथवा वैयक्तीकरित्या घेता येईल. याबाबतची कार्यपध्दती सोबतच्या सादरीकरणात ***जोडपत्र-२*** म्हणून जोडली आहे. तरी, दिनांक १ जानेवारी, २०२१ ते दिनांक १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत आपण स्वत: हरित शपथ घ्यावी. तसेच, आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना, त्याचप्रमाणे आपल्या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना "हरितशपथ"**(Earth Pledge म्हणजेच #Epledge)**घेण्याबाबच्या सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात, हि विनंती.

Warm Regards.

**आपली,**

**(मनीषा पाटणकर-म्हैसकर)**

**सोबत : वरील प्रमाणे**

**प्रति,**
**श्री.राजीव जलोटा,**
**अपर मुख्य सचिव,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**